| | | |
|---|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी**<br>पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार<br>पोलीस आयुक्त यांचे कार्यालय<br>रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे<br>फोन नं ०२२- २९४५१००१<br>**Email ID- pro.cp.mbvv@mahapolice.gov.in** | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

**प्रेसनोट क्रमांक ३५७** **दिनांक २४-१२-२०२१**

## अवैधरित्या वास्तव्य करणाऱ्या नायजेरीयन टोळीला सायबर गुन्हे शाखेने केले जेरबंद.

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयील मिरारोड पोलीस ठाण्याचे हद्दीत सुर्या हेरीटेज, ओसवाल बिल्डींगचे मागे, मिरारोड (पु) ता. जि. ठाणे या ठिकाणी संशयीत नायजेरीयन नागरिक हे अवैधरित्या वास्तव्य करीत असल्याचे तसेच ते ऑनलाईन फसवणुक करीत असल्याबाबत खात्रीशीर माहिती प्राप्त झाल्याने सदर ठिकाणी सायबर शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी जावुन खात्री केली असता तेथे १) मोसेस व्हिक्टर ( नायजेरीयन ) २) अबोह डिक्सन ओडु ( नायजेरीयन ) ३) इशोला काजीम लावल (नायजेरीया) तिघे सध्या रा. रुम नंबर २०२, सुर्या हेरीटेज, ओसवाल बिल्डींगचे मागे, मिरारोड पु. ता. जि. ठाणे हे संशयीतरीत्या मिळुन आले. त्यांचेकडे भारतात वास्तव्याबाबतची कागदपत्रे मागीतली असता त्यांच्याकडे कालबाहय पारपत्र (व्हीसा ) मिळुन आला तसेच त्यांची अंगझडती घेतली असता त्यांचेकडे ०९ मोबाईल हॅन्डसेट, २ लॅपटॉप, २ डोंगल, फेडरल बॅंकेचे कार्ड, २ कालबाहय अतंराष्ट्रीय पारपत्र (व्हीसा) अशा वस्तु मिळून आल्याने त्यांचेविरुध्द मिरारोड पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र. ४५२/२०२१ भारतीय पारपत्र अधिनियम-१९२० चे कलम ३, विदेशी व्यक्ति अधिनियम-११४६ चे कलम ४६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन त्यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. तसेच सदर इसमांविरुध्द हिमाचल प्रदेश येथे फसवुणूकीचा गुन्हा दाखल असल्याबाबतची माहिती प्राप्त झाली आहे.

सायबर गुन्हे शाखा, मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांचेकडुन जनतेला आवाहन करण्यात येते की, अवैधरित्या वास्तव्य करणारे नायजेरीयन तसेच ऑनलाईन फसवुणूक झालेली असल्यास नजीकच्या पोलीस ठाणेस अथवा सायबर गुन्हे शाखा, मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे कार्यालयाशी तात्काळ संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| मिरा रोड पोलीस ठाणे संपर्क क्र:- ९८२१५५३११७ | सायबर गुन्हे शाखा संपर्क क्रमांक :- 022-2811 0135 |
| पोलीस निरीक्षक श्री. पोनि/विजय चव्हाण मोबा.- ९८२१५५३११७ | सायबर गुन्हे शाखा व्हॉट्सअॅप हेल्पलाईन क्रमांक :- 900 4880135 |
| ई-मेल आयडी :- **pi.miraroad.mb-vv@mahapolice.gov.in** | ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in** |

सदरची कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली सायबर गुन्हे कक्षाचे पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, पोउपनिरी संतोष भिसे, पोउपनिरी/ प्रसाद शेनोळकर, पोअं/२०७२ गणेश इलग, मपोशि माधुरी धिंडे, मपोशि/सुवर्णा माळी, मपोशि/पल्लवी निकम यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.